पुणे शहर पोलीस

# दर्पण

सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तका बाबत - -

मी पोना ६८३२ कुमार, नेमणूक वानवडी पो.स्टे.

सध्या मी वानवडी पो.स्टे. येथे सी सो / ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करित आहे. पुण्याचे पोलिस आयुक्त श्री. के. के. व्यंकटेशम् सर यांनी पोलिसांबाबत जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरु केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलिस अधिकारी / व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव फोटो सहित छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलिस सुध्दा चांगले काम करतो आहे याची जाणीव होवू लागली आहे. त्यामुळे पोलिसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलिसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलिस बांधव हे सुध्दा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम करणे बद्दल त्यासाठी प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचेच पुस्तक आहे असे मला वाटते.

पोना ६८३२ कुमार पीडी
वानवडी पो.स्टे. पुणे

**गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय**

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्ॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# पोलिसांमधील माणूस

पोलिसांमधील माणूस

सकाळ – दि. २७ सप्टेंबर, २०१९

# पोलिसांकडून माणुसकीचे दर्शन

## नागरिकांना मदतीचा हात; काहींचे प्राणही वाचविले

**पुणे, ता. २६ :** अतिवृष्टीमुळे शहरात निर्माण झालेल्या पूरस्थितीत पुणे पोलिसांनी माणुसकीचे दर्शन घडविले. त्यांनी बुधवारी रात्रीपासून गुरुवारी सकाळपर्यंत पोलिसी खाक्या बाजूला ठेवत संकटात सापडलेल्या नागरिकांना मदतीचा हात दिला. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी संपूर्ण रात्र लोकांच्या सेवेमध्ये घालविली.

अतिवृष्टीमुळे स्वारगेट, दत्तवाडी, सहकारनगर, बिबवेवाडी, भारती विद्यापीठ, वानवडी, चतु:शृंगी आदी पोलिस ठाण्यांच्या हद्दीमध्ये नागरिकांमध्ये हाहाकार उडाला. परिमंडळ एकच्या पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे, परिमंडळ दोनचे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांच्यासह संबंधित पोलिस ठाण्यांचे पोलिस निरीक्षक



**पद्मावती : पुरातून विजय मोरडे यांना पाठीवर घेऊन सुखरूप बाहेर काढताना पोलिस निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी.**

पद्मावती, कात्रज परिसरामध्ये पोचले. दत्तवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक देविदास घेवारे, स्वारगेट पोलिस ठाण्याचे निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी यांच्यासह सहकारनगर, बिबवेवाडी व भारती विद्यापीठ पोलिसांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वेगवेगळी पथके तयार केली. नियोजनानुसार पोलिस घटनास्थळी दाखल झाले, त्यांनी नागरिकांना पाण्यातून बाहेर काढून सुरक्षितस्थळी हलविण्यास मदत केली. गोरे यांनी पद्मावती परिसरात बचावकार्यात सहभाग घेतला. पोलिस उपनिरीक्षक समाधान कदम, पोलिस कर्मचारी श्रीनिवास केजळे, विजय कुंभार, अमोल मंकराज, समाधान धनवे यांनी जिवाची पर्वा न करता गुरुराज सोसायटीतील महिला, लहान मुले व वृद्धांना पाण्याबाहेर काढले. सकाळी सात वाजेपर्यंत ठिकठिकाणी पोलिसांकडूनही नागरिकांसाठी मदतकार्य सुरू होते.

### जिवाची पर्वा न करता...

गुरुराज सोसायटीजवळील नागरिकांना पोलिसांनी बाहेर काढले, त्याचवेळी ओढ्यानजीक असलेल्या घरात पुराच्या सहा फूट पाण्यामध्ये अडकलेल्या विजय मोरडे (वय ६५) यांची पोलिसांनी सुटका केली. पोलिस निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी यांनी छातीइतक्या पाण्यामध्ये जाऊन मोरडे यांना वाचवले. त्यानंतर जखमी अवस्थेत मोरडे यांना सुरक्षित स्थळी हलविले.

पुढारी – दि. ३ सप्टेंबर, २०१९

# नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण

## येरवडा पोलिसांची कामगिरी

पुणे/येरवडा : प्रतिनिधी

सेल्फी घेत असतानाच नदीत कोसळलेल्या मुलाचे येरवडा पोलिसांनी प्राण वाचविले. येरवडा येथील नदीपात्रालगत सयाजीनाथ माळी घाटावर ही घटना घडली.

यश संजय वाळके (वय १० वर्षे, रा. भीमज्योत मित्रमंडळाजवळ, येरवडा) असे या मुलाचे नाव आहे. गणेशोत्सवामुळे परिसरात नागरिकांचीही मोठी गर्दी आहे. या ठिकाणी पोलिसांनी बंदोबस्त ठेवला. यश व त्याचे मित्र सयाजीनाथ माळी घाटावर आले होते. या वेळी यश मित्रांसोबत सेल्फी घेत होता; मात्र अचानक यशचा पाय घसरला अन् तो नदीपात्रात कोसळला. नदीतील पाण्यात वाहून जात होता. त्या ठिकाणी कर्तव्यावर असणाऱ्या पर्णकुटी पोलिस उपनिरीक्षक भूषण कोटे, उपनिरीक्षक शांतुमल कोळुरे, कर्मचारी जाधव, संभाजी पाटील व स्थानिक नागरिक विपिन खंडागळे यांनी यश याला पोहत जाऊन नदीतून सुखरूप बाहेर काढले आणि त्याच्या आईवडिलांकडे सोपवले. मुलाचे प्राण वाचवल्याबद्दल आईवडिलांनी पोलिसांचे आभार मानलेत.



वाहून जाणाऱ्या यश वाळके या मुलाला सुखरूप बाहेर काढण्यात आले. या वेळी त्याच्यासोबत येरवडा पोलिस व स्थानिक नागरिक.

# व्हिडिओ कॉल सुरु ठेवून आत्महत्येचा प्रयत्न

## तत्काळ मदतीला धावून पोलिसांनी वाचवले प्राण

**पुणे : प्रतिनिधी**

बेरोजगारी व घरगुती भांडणाला कंटाळलेल्या एका २५ वर्षीय तरुणाने वडिलांच्या मोबाईलवर केलेला व्हिडिओ कॉल तसाच सुरू ठेवून घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, उत्तमनगर पोलिसांच्या प्रसंगावधानातून त्या तरुणाचे प्राण वाचू शकले. हा प्रकार स्नेहा अपार्टमेंट, दांगट इस्टेट, शिवणे या ठिकाणी घडला आहे.

रात्री दोनच्या सुमारास शिंदे पूल-शिवणे या ठिकाणी नाकाबंदी करत असताना एक व्यक्ती धावत पोलिसांजवळ आला. त्या वेळी त्याने घाबरत त्याच्या मोबाईलवरील एक व्हिडिओ कॉल उपनिरीक्षक शिंदे यांना दाखवला. त्यामध्ये एक तरुण साडीच्या साह्याने पंख्याला गळफास घेत असल्याचे दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी त्या व्यक्तीला माहिती विचारत तत्काळ तो तरुण गळफास घेत असलेल्या ठिकाणाकडे धाव घेतली.

गळफास घेणारा मुलगा सोसायटीच्या पाचव्या मजल्यावर होता. दरम्यान या वेळी लिफ्टदेखील बंद होती. त्यामुळे पोलिसांनी धावत जाऊन त्याची खोली गाठली. मात्र, तरुणाने आतून खोलीचा दरवाजा बंद केला होता. पोलिसांनी दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश करून तरुणाला अलगद उचलून धरले. त्यानंतर इतरांनी त्याला सोडून खाली घेतले. पोलिसांनी खाली घेताच तो रडायला लागला. पोलिसांनी त्याला आत्महत्येचे कारण विचारले, तेव्हा त्याने बेरोजगारी व घरच्यांसोबत झालेल्या कौटुंबिक वादातून त्याला सोडून निघून गेले, म्हणून जीवनाचा कंटाळा आल्यामुळे आत्महत्या करत असल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी केलेल्या समुपदेशनामुळे हा तरुण आत्महत्येपासून परावृत्त झाला. ही कामगिरी हवालदार भोंडेकर, अजित शेंडगे यांच्या पथकाने केली.

**पुढारी** – दि. १८ सप्टेंबर, २०१९

# नदीत उडी मारलेल्या तरुणाला वाचवले

**पुणे : प्रतिनिधी**

पती-पत्नीच्या वादातून आत्महत्येसाठी नदीपात्रात उडी मारणाऱ्या तरुणाला येरवडा पोलिसांनी वाचविले. तो चिमुकलीसह उडी मारणार होता, पण सुदैवाने त्याने विचार बदलून तिला कठड्यावर ठेवून स्वत: उडी मारली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. बंडगार्डन बंधारा परिसरात एक जण हातात चिमुकलीला घेऊन नदीपात्रात उडी मारण्यास जात असल्याचे येथील नागरिकांनी पाहिले. त्यांनी तत्काळ पर्णकुटी पोलिस चौकीत धाव घेऊन माहिती दिली. या वेळी चौकी अंमलदार सुनील जाधव यांनी तत्काळ बीट मार्शलवरील सचिन जाधव व उमेश चिकणे यांना बोलवून घेत बंधाऱ्यावर धाव घेतली. येथील नागरिकांनाही बोलावले. या वेळी त्याने पाण्यात उडी मारल्याचे दिसले. नागरिकांनी त्याला बाहेर काढले. चिमुकलीबाबत विचारपूस केली असता त्याने कठड्यावर ठेवल्याचे सांगितले. घरगुती कारणावरून पत्नीसोबत वाद झाला होता. त्यातून मी मुलीला घेऊन आत्महत्या करण्यास आलो होतो; पण येथे आल्यानंतर विचार बदलला. तिला कठड्यावर ठेवून उडी मारल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या पत्नीला बोलावून घेतले; तसेच समुपदेशन करून त्यांच्यातील वाद मिटवला.

**पुण्यनगरी** – दि. १ सप्टेंबर, २०१९

# दामिनीमुळे वाचली महिला

**। पुणे : प्रतिनिधी**

किरकोळ कारणावरून आत्महत्या करण्यासाठी निघालेल्या विवाहितेचा दामिनी पथकाच्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांमुळे जीव वाचला. ही घटना स्वारगेट बसस्टँडमध्ये घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, महिला पोलीस शिपाई एस. बी. रणसिंग व महिला पोलीस नाईक जे. बी. भालेराव या स्वारगेट बसथांब्याजवळ गस्त घालत होत्या. त्यावेळी प्रफुल्ल शेळके (वय २६, रा. चंदननगर) हे घाईगडबडीत इतर दोन महिलांना घेऊन पोलीस कर्मचाऱ्यांजवळ आले. त्यांनी मोबाइलमधील फोटो दाखवला.

प्रफुल्ल शेळके यांनी सांगितले की, माझे पत्नीबरोबर भांडण झाले होते. तिने अनोळखी फोनवरून सांगितले की, मी स्वारगेट बसथांब्यामध्ये असून, आत्महत्या करणार आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने त्या महिलेचा शोध घेतला. तिला पोलीस ठाण्यात नेऊन समजावून सांगितले. संसार दोघांचा असतो, भांडण करू नका, चांगला संसार करा, असा सल्ला दिला.

# मिरवणुकीत हरवलेला मुलगा आईच्या ताब्यात

## उत्तमनगर येथील घटना

**पुणे : प्रतिनिधी**

विसर्जन मिरवणुकीत एकीकडे डॉल्बीचा दणदणाट सुरू होता, तर दुसरीकडे रस्त्यावरील नागरिकांचा घोळका नाचण्यात दंग होता. त्यामध्ये रस्त्याच्या कडेला एक लहान चार वर्षांचा मुलगा एकटाच रडत होता. पोलिसांनी त्याच्याकडे नाव, पत्याबाबत विचारणा केली असता त्यास नाव सांगता येत नव्हते. दरम्यान, एका पोलीस कर्मचाऱ्याने त्यास कडेवर घेत परिसरात फिरून पालकांचा शोध घेतला आणि मुलास सुखरूप आईच्या ताब्यात दिले. जय गणेश अडागळे (वय ४ वर्षे रा. उत्तमनगर) असे सापडलेल्या मुलाचे नाव आहे.



उत्तमनगर पोलीस गुरुवारी दि. १२ सप्टेंबर रोजी गणपती विसर्जन मिरवणुकीसाठी बंदोबस्तासाठी परिसरातील रस्त्यांवर तैनात होते. या वेळी दुपारी साडेबाराच्या सुमारास गर्दीमध्ये पालकांपासून हरवलेला एक चार वर्षांचा मुलगा रडत रस्त्याच्या कडेला उभा असलेला दिसून आला. एकीकडे जोरजोरात ध्वनिवर्धक वाजत होते आणि दुसरीकडे नागरिकांचा घोळका नाचण्यात दंग होते. रस्त्यावर मोठ्याप्रमाणात गर्दी झाली होती. मुलाकडे कोणाचेही लक्ष नव्हते. पोलिसांनी गर्दीमधील नागरिकांना हा मुलगा कोणाचा आहे याबाबत विचारणा केली. मात्र, मुलाचे आईवडील मिळून आले नाहीत.

पोलीस शिपाई संभाजी कोंढावळे यांनी मुलास गर्दीपासून बाजूला घेऊन गेले. त्यांनी त्याला पाणी तसेच खाऊ देत शांत केले. तसेच त्याचे नाव आणि पत्ता आदींबाबत विचारणा केली. मात्र, मुलास काही सांगता येत नव्हते. तसेच तो सारखा रडत होता. त्यानंतर कोंढावळे यांनी त्याला कडेवर घेतले आणि ते विसर्जन मिरवणूक सुरू असलेल्या रस्त्यावर फिरून हा मुलगा कोणाचा आहे याबाबत विचारणा करीत फिरू लागले. या वेळी जय याला पाहून एक महिला धावत आली आणि त्यांनी हा मुलगा माझा असल्याचे सांगितले आणि कोंढवळे यांच्याकडून त्याला स्वतःच्या कुशीत घेतले. तिच्याबरोबर मुलाचे कुटुंबीयही शोध घेत दाखल झाले. ते सर्व मागील दोन तासांपासून जय याचा शोध घेत होते. जय सुखरूप मिळाल्याने सर्वांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले सर्वांनी कोंढावळे यांचे आभार मानले.

संभाजी कोंढावळे हे भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर ते पुणे शहर पोलीस दलात भरती झाले. त्यांनी सैन्य दलातही चांगली सेवा बजावलेली आहे, अशी माहिती उत्तमनगर पोलिसांनी दिली.

# शिवणेत गळफास घेणाऱ्या युवकाला पोलिसांनी वाचविले

**पुणे : प्रतिनिधी**

बेरोजगारी, तसेच कुटुंबीयांशी होणाऱ्या भांडणाला कंटाळून एका युवकाने मित्राला व्हिडीओ कॉल लावून गळफास घेत आत्महत्या करीत होता. मात्र, मित्राने शिवणे परिसरात नाकाबंदीसाठी उभे असलेल्या पोलिसांना या प्रकाराबाबत माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत दरवाजा तोडून फासावर लटकत असलेल्या युवकास खाली घेत त्याचा प्राण वाचविला. शिवणेतील दांगट इस्टेट भागात शनिवारी रात्री हा प्रकार घडला.

उत्तमनगर पोलीस ठाण्यातील पथक शिवणेतील शिंदे पूल येथे शनिवारी (दि. १४ सप्टेंबर) नाकाबंदी करीत होते. या वेळी रात्री दोनच्या सुमारास एक युवक धावत पोलिसांजवळ आला आणि त्याने त्याचा मित्र राहत्या घरी आत्महत्या करण्यासाठी पंख्याला साडी बांधत असतलेला व्हॉट्सॲपवरील लाइव्ह व्हिडीओ कर्मचाऱ्यांना दाखविला. युवकाने पोलिसांना पत्ता सांगताच तेथून एक किलोमीटर दूर अंतरावरील दांगट पाटील इस्टेटमधील स्नेहा अपार्टमेंटमध्ये दाखल झाले.

## पुलावरून उडी मारणाऱ्याला बाहेर काढले

दुसऱ्या एका घटनेत पत्नीसोबत होणाऱ्या वादातून एक व्यक्ती लहान बाळासह आत्महत्या करण्यासाठी बंडगार्डन बंधाऱ्याकडे धावत गेल्याची माहिती पर्णकुटी पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस हवालदार सुनील जाधव, सचिन जाधव आणि उमेश चिकणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी सदर व्यक्तीने मुलीस पुलाच्या कठड्याजवळ ठेवून पाण्यात उडी मारली. दरम्यान, त्याच्या पाठोपाठ पोलिसांनी पाण्यात उड्या घेत आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीस पाण्याबाहेर काढले.

सकाळ – दि. ६ सप्टेंबर, २०१९

# संवेदनशील तरुणामुळे मुलगी वडिलांच्या कुशीत !

## स्वारगेट बस स्थानकात चुकलेल्या मुलीस संकेत कालगावकर याच्यामुळे पुन्हा भेटले पालक



पुणे : हरवलेली मुलगी स्वारगेट पोलिसांकडे सुपूर्त करताना संकेत कालगावकर (डावीकडून तिसरा) व इतर.

**» विधायक**

**डोर्लेवाडी, ता. ५ :** स्वारगेट (पुणे) बस स्थानकात गर्दीत हरवलेली मुलगी झारगडवाडी (ता. बारामती) येथील संकेत संजय कालगावकर याच्या संवेदनशीलतेमुळे तिच्या पालकांना मिळाली.

संकेत हा मुंबईतील एका खासगी जाहिरात एजन्सीत नोकरीस आहे. तो रविवारी (ता. १) वाढदिवसानिमित्त गावी येताना मित्रांना भेटण्यासाठी पुण्यात थांबला होता. मित्रांना भेटून बारामतीकडे येण्यासाठी स्वारगेट बस स्थानकात आल्यावर त्या ठिकाणी त्याला एक चार वर्षांची मुलगी रडताना दिसली. संकेत याने जवळ जाऊन मुलीची विचारपूस करण्याचा प्रयत्न केला; परंतु तिला मराठी व हिंदी या दोन्ही भाषा येत नव्हत्या. पण, तिच्या भेदरलेल्या अवस्थेवरून ती चुकली असल्याचे त्याच्या लक्षात आले. संकेत व त्याचा मित्र सुहास तावरे यांनी त्या मुलीला स्वारगेट बस स्थानकात आणून उद्घोषणा करायला सांगितले. पण, त्याचा काही फायदा झाला नाही. काही वेळात स्वारगेट पोलिस ठाण्याचे कर्मचारी अमीन शेख त्या ठिकाणी आले असता त्यांना पान २ वर »

### पालक येईपर्यंत मुलीजवळ थांबले

सातान्याकडे निघालेले शांताराम साहू मुलीला घेण्यासाठी स्वारगेट पोलिस ठाण्यात येईपर्यंत संकेत कालगावकर व त्याचा मित्र सुहास तावरे हे मुलीपाशी थांबून होते. मुलगी मिळाल्यानंतर साहू यांनी दोघांचेही आभार मानले. पोलिस कर्मचारी शब्बीर सय्यद, अमीन शेख, विजय खोमणे, कदम यांनी याकामी सहकार्य केले.

सकाळ – दि. २५ सप्टेंबर, २०१९

# ...आणि पोलिसांचेही डोळे पाणावले

## तीन तासांच्या प्रयत्नानंतर चिमुकलीला भेटले आई-वडील

**हडपसर, ता. २४ :** हडपसर पोलिसांच्या सतर्कतेमुळे भेकराईनगर येथून भरकटलेल्या दोन वर्षांच्या चिमुकलीला भेटले तिचे आई-वडील. तीन तासांच्या अथक परिश्रमानंतर मुलीच्या आई- वडिलांचा शोध लागला. आईला बघताच स्वप्नाने आईकडे झेप घेतली. आईने तिला छातीशी कवटाळीत अश्रूंना वाट मोकळी करून दिली. ताटातूट झालेल्या मायलेकीला भेटताना पाहून चौकीतील पोलिसांचे डोळेही पाणावले.

हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रघुनाथ जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी स्वप्ना घरी झोपली होती. तिचे वडील सुरक्षारक्षक आहेत. ते टाकीत पाणी पाहण्यासाठी टेरेसवर गेले होते. आई अंघोळीला गेली होती. झोपलेली स्वप्ना झोपेतून उठल्यानंतर अचानक घरातून बाहेर पडली. घरापासून दीड किलोमीटर अंतरावरील अभय सीएनजी पंपावर ती भरकटत पोचली. तिच्या भेदरलेल्या अवस्थेवरून ती चुकली असावी, असे पंपावरील कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तत्काळ पोलिसांना याबाबत कळवले. त्यानंतर पोलिस कर्मचारी युवराज कांबळे व अंकुश झगडे यांना मुलीच्या पालकांचा शोध घेण्याचे निर्देश दिले. पेट्रोल पंपावर त्यांनी मुलीला ताब्यात घेतले. मात्र ती नेपाळी असल्याने तिला हिंदी व मराठी बोलता येत नव्हते. त्यामुळे पोलिसदेखील हैराण झाले. मुलीच्या पालकांचा शोध कसा घ्यावयचा या काळजीत ते पडले.

मुलगी कामगार वर्गाच्या कुटुंबातील असावी असा अंदाज करून त्यांनी भेकराईनगर व फुरसुंगी परिसरांत स्वप्नांच्या नातेवाइकांचा शोध घेण्यास सुरवात केली. तीन तासांच्या शोधकार्यानंतर त्यांना भेकराईनगर येथे लोकांची गर्दी दिसली. तेथे गेल्यानंतर स्वप्नाची आई ती हरवल्यामुळे रडत असल्याचे निदर्शनास आले. स्वप्नाचे आई-वडील दोन दिवसांपूर्वीच येथे राहण्यास आले होते. त्यांनाही मराठी व हिंदी बोलता येत नव्हते. त्यामुळे त्यांना हडपसर पोलिस ठाण्यात आणले. आईला बघाताच स्वप्नाने आईकडे झेप घेतली. आईने तिला छातीशी कवटाळीत अश्रूंना वाट मोकळी करून दिली. ताटातूट झालेल्या मायलेकीला भेटताना पाहून चौकीतील पोलिसांचे डोळेही पाणावले. या निमित्ताने पोलिसांवर अनेकदा ताशेरे ओढले जातात. मात्र पोलिसांतल्या माणसाचं रूपही जगासमोर आलं.



**हडपसर पोलिस ठाणे : पोलिसांच्या सतर्कतेमुळे भेकराईनगर येथून भरकटलेल्या दोन वर्षांच्या चिमुकलीला तिचे आई-वडील भेटले.**

लोकमत – दि. ४ सप्टेंबर, २०१९

## सिंहगड रस्ता पोलिसांची कामगिरी : सोशल मीडिया व सीसीटीव्हीच्या आधारे घेतला शोध

# चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नऱ्हे :** तीन वर्षांचा लहान मुलगा रस्त्यावर एकटा रडत असून त्याला नाव पत्ता सांगता येत नसल्याचे एका नागरिकाने फोन करून कंट्रोल रूमला कळविले. त्यानंतर सिंहगड रस्ता पोलिसांनी तातडीने त्या लहान मुलाच्या पालकांचा शोध सोशल मीडिया व सीसीटीव्हीच्या आधारे घेऊन अवघ्या साडेचार तासांत त्या लहान मुलाला पालकांच्या स्वाधीन केले.



चुकलेल्या तीन वर्षांच्या मुलाला आईवडिलांच्या स्वाधीन करताना पोलीस.

वडगाव बुद्रुक येथे रस्त्यावर तीन वर्षांचा लहान मुलगा रडत असताना एका नागरिकास आढळल्याने त्यांनी शंभर नंबरला फोन करून याबाबत कळवून पोलिसांना बोलाविले. वडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते शिवभाऊ पासलकर, निखिल दांगट, अनिल कंधारे, अविनाश वांजळे, संजय पवळे आदींना ही बातमी समजताच त्यांनी सदर मुलाचा फोटो सोशल मीडियावर टाकून मुलाच्या पालकांना शोधण्याचे आवाहन केले. तसेच पोलिसांनी लहान मुलांसोबत या सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन परिसरातील भागात चौकशी केली. मात्र मुलाला कोणीच ओळखत नसल्याने शोधकार्यात अडचण येत होती.

त्यानंतर बिट मार्शल सचिन तूपसौदर, पोलीस अधिकारी प्रल्हाद कडू, प्रकाश साळुंके यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेऊन सदर मुलाच्या आईवडिलांचा शोध घेतला. त्यानंतर त्यांना वडगाव चौकीत बोलावून मुलगा अरुण कुमार चव्हाण (वय ३ वर्षे ) यास त्यांच्या स्वाधीन करण्यात आले.

> माझी तब्येत बरी नसल्याने मी आमच्या नातेवाइकांकडे राहावयास आले होते. मी सकाळी अंघोळीस गेल्यानंतर माझा तीन वर्षांचा मुलगा अरुण हा मला न सांगता बाहेर गेला. मात्र थोड्या वेळाने आम्ही शोधाशोध करीत असताना शेजारील महिलेने आम्हास सोशल मीडियावर आलेला माझ्या मुलाचा फोटो दाखविल्याने आम्ही तत्काळ वडगाव चौकीत गेलो.
>
> – रेश्मा चव्हाण, (मुलाची आई)

**सामना** – दि. २९ सप्टेंबर, २०१९

# मोबाईलचोर महिलेला दामिनी मार्शलने पकडले

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – तुळशीबागेत दामिनी मार्शलला पाहताच एका महिलेने स्वत:ला छत्रीने झाकून घेत विक्रेत्याचा बनाव केला. मात्र, संशयावरून आणि सीसीटीव्हीच्या फुटेजच्या मदतीने दामिनी मार्शलने मोबाईलचोर महिलेला ताब्यात घेत तरुणाला मोबाईल मिळवून दिला आहे. त्यामुळे सुतावरून स्वर्ग गाठण्याच्या नावलौकिकाला दामिनी पथकाने अधोरेखित केल्याचे स्पष्ट झाले आहे.



उमेरा नूरमोहम्मद शेख (वय ३०, रा. लोहियानगर) असे ताब्यात घेतलेल्या महिलेचे नाव आहे.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खरेदी करण्यासाठी तुळशीबाग परिसरात मोठ्या प्रमाणात महिलांकडून खरेदीला प्राधान्य दिले जाते. त्यावेळी चोरट्यांकडून गर्दीचा फायदा घेत पर्स, सोनसाखळी हिसकाविण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे विश्रामबाग, डेक्कन, शिवाजीनगर,फरासखाना दामिनी पथकाकडून तुळशीबाग परिसरात पेट्रोलिंग करण्यात येत होते. त्यावेळी तुळशीबाग परिसरातील विश्व हॉटेलमध्ये पाणी पिण्याच्या बहाण्याने महिलेने तरुणाचा मोबाईल चोरल्याची माहिती दामिनी पथकाला मिळाली. त्यानुसार हॉटेलमधील सीसीटीव्हीचे फुटेज पाहिल्यानंतर दामिनी पथक तुळशीबाग परिसरात महिलेचा शोध घेत पेट्रोलिंग करीत होते.

दामिनी पथकाला पाहताच तुळशीबाग परिसरात विविध वस्तू विक्री करण्याचा बनाव करणाऱ्या एका महिलेने छत्रीने स्वत:ला झाकून घेतले. त्यामुळे संशय वाढल्याने महिला पथकाने छत्रीखाली दडलेल्या महिलेला विचारपूस केली. सीसीटीव्ही फुटेजमधील महिला आणि छत्रीखाली दडलेली महिला एकसारखीच असल्याचे दामिनी पथकाच्या लक्षात आले. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांनी तिला विचारपूस केली असता, तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पथकाने उमेराला पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता, तिने मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी महिलेकडून मोबाईल ताब्यात घेत मोहसुद अन्सारी (वय २२) तरुणाला दिला. ही कामगिरी भरोसा सेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजया कारंडे, पोलीस उपनिरीक्षक एस. एन. केदार यांच्या मार्गदर्शनाखाली श्वेता वलेकर, रुबीना शेख, चांदणी वडमारे, निमगिरे यांच्या पथकाने केली.

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिति नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अंमलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट : - के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय : - दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षापासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्ह्याचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणा-या अडचणी कशा सोडवाव्या या संदर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले सबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबात मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर



चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत
At junctions of Smart City, an 'intelligent' syste
to help manage Pune's many traffic problems
आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'
गुन्हे शाखेने ८० लाखांचे हस्तिदंत पकडले
नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण
स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच
व्हिडिओ कॉल सुरू ठेवून आत्महत्येचा प्रयत्न
वक्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध
चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त
नदीत उडी मारलेल्या तरुणाला वाचवले
द्धिवादाची जोपासना करा
या व्यवसायाचा पर्दाफाश
तंबाखूजन्य पदार्थ
दागिनेचोर जेरबंद
ILLEGAL SAND TRANSPORTATION
Driver arrested for stealing trucks attached by revenue dept officials
डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक
गुन्हेगार जेरबं
वाघाच्या कातड्याची तस्करी
बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत
e Branch busts inters
दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त
पिस्तुलाची हौस पडली महागात!